# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,

सूचना का अधिकार

कृषिनगर, अकोला-४४४१०४ महा.

डॉ. जी. यु. सातपुते

उपकुलसचिव (शिक्षण)

Email : dyracad@pdkv.ac.in

arexam@pdkv.ac.in

दूरध्वनी : ०७२४–२२५८३७२


जा.क. परिक्षा/शा.अ/ 1175 /२०२१

दिनांक: 16/11 /२०२१

प्रति,

मा. सहयोगी अधिष्ठाता/प्राचार्य,

सर्व पदवी महाविद्यालय

............................................

विषय:आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बदल्यांबाबत.

संदर्भ: म.कृ.शि.व.सं.प., पुणे यांचे परिपत्रक क्र.मकृप/शिक्षण-1/310/10/871,दि.23 मार्च,2010

उपरोक्त विषयावरील संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयांतुन इतर महाविद्यालयांत तिस-या षण्मासिकाला बदलीस इच्छूक असलेल्या विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील संपुर्ण माहितीसह परिपूर्ण अर्ज रु 500/- चा धनाकर्ष जोडून 25.11.2021 पर्यंत या कार्यालयास सादर करण्यांत यावा.विद्यापिठाचे परिपत्रक pdkv.ac.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

तसेच आपल्या महाविद्यालयातील रिक्त जागेचा तपशिल या कार्यालयास तात्काळ विनाविलंब सादर करण्यात यावा.

Satpute

उपकुलसचिव (शिक्षण)

डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,

सूचना का अधिकार

कृषिनगर, अकोला-४४४१०४ महा.

डॉ. जी. यु. सातपुते
उपकुलसचिव (शिक्षण)

Email : dyracad@pdkv.ac.in
arexam@pdkv.ac.in
दूरध्वनी : ०७२४–२२५८३७२


जा.क. परिक्षा/शा.अ/ 1176/२०२१
दिनांक: 16/11/२०२१

परिपत्रक

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ,अकोला अंतर्गत महाविद्यालयातिल बदलिस इच्छूक असलेल्या दुस-या षण्मासिकातील विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील संपुर्ण माहितीसह परिपूर्ण अर्ज रू 500/- चा धनाकर्ष (धनाकर्ष सहायक कुलसचिव (साप्रवि),डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांचे नावे काढण्यात यावा.) जोडून 25.11.2021 पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावा. सदरिल माहिती या कार्यालयाच्या E-mail वर तात्काळ स्वरूपात पाठवावी आणि सदरिल कागदपत्रे त्वरीत पोस्टाने/विशेष दुत्तावदारे सादर करण्यात यावीत.विद्यार्थ्यांनी भरून देण्यांकरीता विहित नमुन्याचा अर्ज सोबत जोडण्यात येत आहे.

उपकुलसचिव (शिक्षण)
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

'आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था'

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

e_mail: edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी / फॅक्स क्र. २५५३७६८८

वेबसाईट: www.mcaer.org


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३१०/१०/८७१ दि.२३ मार्च,२०१०

## <u>प रि प त्र क</u>

**विषय:- राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदल्यांबाबत निकष व कार्यपध्दती.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी व संलग्न विद्याशाखांची पदवी अभ्यासक्रमाची ११८ महाविद्यालये अस्तित्वात आहेत. या महाविद्यालयांमध्ये केंद्रीय पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असल्यामुळे ब-याचवेळा विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ पसंतीक्रमाऐवजी राज्यातील अन्य महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळत असतात. वैयक्तिक अडचणी, हवामान न मानवणे, प्रकृती अस्वास्थ्य इत्यादी अनेक कारणांमुळे एका कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयातून दुस-या कृषी विद्यापीठांतर्गत असणा-या महाविद्यालयामध्ये (आंतरविद्यापीठीय) किंवा एकाच कृषी विद्यापीठांतर्गत इतर महाविद्यालयामध्ये (आंतरमहाविद्यालयीन) बदली होण्याबाबत विद्यार्थ्यांकडून अर्ज करण्यात येतात. ही बाब विचारात घेता, अशा बदल्यांसाठी कार्यपध्दती विहित करणे, त्यासाठी निकष निश्चित करणे इत्यादी बाबी कृषी परिषद कार्यालयाच्या विचाराधीन होत्या.

यासंदर्भात कृषी परिषदस्तरावर राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील संबंधित अधिका-यांची बैठक आयोजित करून याप्रकरणी निकष व कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. गरजू विद्यार्थ्यांना याबाबत नीट आकलन व्हावे, बदलीची पात्रता विचारात घेऊन आवश्यक त्या पूर्ततेसह विहित वेळेत योग्य ठिकाणी विद्यार्थ्यांनी विहित प्रपत्रात अर्ज सादर करावेत, यासाठी निश्चित केलेले निकष **परिशिष्ट 'अ'** मध्ये देण्यात आले असून कार्यपध्दती **परिशिष्ट 'ब'** मध्ये विशद करण्यात आली आहे. निकष पूर्ण करीत असलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांनी विहित कार्यपध्दतीने विनंती अर्ज सादर करण्यासाठी विनंती अर्जाचा विहित नमुना **परिशिष्ट 'क'** येथे देण्यात आला आहे.

सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या **'www.mcaer.org'** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असल्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांना विनंती अर्जाची प्रत याच संकेतस्थळाद्वारे प्राप्त करून घेता येईल.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या शासकीय, अनुदानित आणि विना अनुदानित महाविद्यालयांच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सर्व इच्छुक विद्यार्थ्यांना आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदलीचे निकष व कार्यपध्दती अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून या

परिपत्रकास **दरवर्षी दि. १ एप्रिल ते १५ एप्रिल या कालावधीमध्ये आपापल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दी द्यावी.**

प्रस्तुत परिपत्रकातील निर्देशांची सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सहपत्रे : चार.

स्वाक्षरीत/-
**(गणेश ठाकूर)**
**महासंचालक**

प्रति,

(१) राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमाची सर्व शासकीय / अनुदानित / विना अनुदानित महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य.

२/- सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत परिपत्रकाची प्रत त्यांनी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर उपरोक्त कालावधीमध्ये प्रसिध्द करून **दरवर्षी पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

प्रतः-

(२) अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभंणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली

(३) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / मराठवाडा कृषी विद्यापीठ, परमणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, प्राप्त विनंती अर्जांपैकी आपल्या विद्यापीठांतर्गत आंतरमहाविद्यालयीन बदली अर्जांची छाननी करून **पंधरा दिवसांच्या कालावधीत** अशा आंतरमहाविद्यालयीन बदली अर्जांबाबत विद्यापीठस्तरावर योग्य ते निर्णय घेऊन आपल्या विद्यापीठाच्या अधिष्ठाता (कृषी) यांच्या मान्यतेने ते निकाली काढावेत. तद्नंतर आंतरविद्यापीठीय विनंती अर्जांची छाननी करून **परिशिष्ट 'ड' प्रमाणे गोषवारा दहा दिवसांच्या कालावधीत कृषी परिषद कार्यालयास यथावश्यक रकमेच्या धनाकर्षासह सादर करावा.**

प्रतिलिपी :

(१) मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मा. मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी...

(२) मा. उपाध्यक्ष यांचे स्वीय सहायक, कृषी परिषद, पुणे यांना माहितीसाठी...

(३) श्रीमती रुपाली विश्वकर्मा, मे. विनटेक सोल्युशन्स, ऑफीस क्र. १०, मयूर नगरी, काटेपूरम चौकाजवळ, नवी सांगवी, पुणे-१७.

२/- यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी उक्त परिपत्रक सहपत्रांसह कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर त्वरीत उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी.

C/S

## परिशिष्ट 'अ'

### राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदल्यांसाठी निकष

(१) पदवी अभ्यासक्रमाच्या फक्त तिसऱ्या आणि पाचव्या सत्रासाठी बदल्या करण्यात येतील.

(२) तिसऱ्या सत्रामध्ये बदलीस इच्छुक विद्यार्थी पहिल्या सत्राचे सर्व विषय उत्तीर्ण असणे अनिवार्य असावे. तसेच पाचव्या सत्रामध्ये बदलीस इच्छुक विद्यार्थी तिसऱ्या सत्रापर्यंतचे सर्व विषय उत्तीर्ण असणे अनिवार्य असावे.

(३) आंतरविद्यापीठ बदल्यांसंबंधीचे प्रस्ताव कृषी परिषद कार्यालयास सादर करतांना प्रति विद्यार्थी रु.२५०/- याप्रमाणे शुल्काची एकूण रक्कम धनाकर्षाद्वारे कृषी परिषद कार्यालयात जमा करावी.

(४) संबंधित रकमेचा धनाकर्ष असल्याशिवाय याबाबतचे प्रस्ताव विचाराधीन घेतले जाणार नाहीत. याची कुलसचिव व अधिष्ठाता यांनी कृपया नोंद घ्यावी.

(५) महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमतेंतर्गत रिक्त जागीच बदल्या करण्यात याव्यात. म्हणजेच महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त जागांवर बदल्या करु नयेत.

(६) भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या कोटयांतर्गत प्रवेश घेतलेले विद्यार्थी तसेच व्यवस्थापन कोटयांतर्गत प्रवेश घेतलेले विद्यार्थी आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदलीसाठी पात्र ठरविण्यात येऊ नयेत.

(७) विद्यार्थ्यांच्या बदल्या गुणवत्तेनुसार करण्यात याव्यात. यामध्ये तिसऱ्या सत्रासाठी बदली असल्यास पहिल्या सत्राचे गुण विचारात घ्यावेत. पाचव्या सत्रासाठी बदली असल्यास पहिल्या ते तिसऱ्या सत्रापर्यंतचे गुण विचारात घ्यावेत.

(८) विद्यार्थ्याने वैद्यकीय कारणास्तव बदली मागितली असल्यास जिल्हा शल्य चिकित्सकाचे (Civil Surgeon) प्रमाणपत्र अनिवार्य असावे.

(९) शासकीय / अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थी शासकीय / अनुदानित महाविद्यालयांमध्ये बदलीस पात्र असावा. शासकीय / अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थी विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये बदलीसाठी पात्र असावा. विना अनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थी विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये बदलीसाठी पात्र असावा.

(१०) सध्या शिकत असलेल्या महाविद्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र अनिवार्य असावे.

(११) बदलीस इच्छुक विद्यार्थ्याची यापूर्वी आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदली झालेली नसावी.

(१२) विद्यापीठांतर्गत आंतरमहाविद्यालयीन बदली असल्यास याबाबत उक्त निकषानुसार संबंधित विद्यापीठस्तरावर निर्णय घेण्यात यावेत.

(१३) कृषी विद्यापीठस्तरावर आंतरमहाविद्यालयीन बदल्यांची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आंतरविद्यापीठीय बदल्यांसदर्भात कृषी परिषदस्तरावर निर्णय घेण्यात यावेत. तथापि, कृषी परिषदेच्या मान्यतेनंतर संबंधित कृषी विद्यापीठांनी बदल्यांविषयक आदेश निर्गमित करावेत.

(१४) पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंतरविद्यापीठीय व आंतरमहाविद्यालयीन बदल्या करण्यात येऊ नयेत.

## परिशिष्ट 'ब'

### राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या आंतरविद्यापीठीय / आंतरमहाविद्यालयीन बदल्यांसाठी कार्यपध्दती

(१) बदलीस इच्छुक विद्यार्थ्याने विहित अर्ज रु. ५००/- शुल्कासह संबंधित महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता किंवा प्राचार्य यांच्याकडे विनंती अर्ज सादर करावा. विहित प्रपत्रासोबत शुल्काचे धनाकर्ष जोडावे. 'नियंत्रक, .......(सध्याचे विद्यापीठ)...... ' नावे व संबंधित कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी देय धनाकर्ष असावे. सदरचे शुल्क 'ना परतावा' राहील.

(२) आंतरविद्यापीठीय बदली असल्यास अशाप्रकरणी रु.५००/- शुल्कापैकी रु.२५०/- शुल्क कृषी परिषद कार्यालयाकडे धनाकर्षाद्वारे वर्ग करण्याची कार्यवाही कृषी विद्यापीठाने करावी. धनाकर्ष "वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे" या नावे पुणे येथे देय असावे.

(३) तिस-या सत्रामध्ये बदलीस इच्छुक विद्यार्थ्याने दुस-या सत्राच्या अंतिम परीक्षा कालावधीत तसेच पाचव्या सत्रामध्ये बदलीस इच्छुक विद्यार्थ्याने चौथ्या सत्राच्या अंतिम परीक्षा कालावधीत सध्याच्या महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्याकडे अर्ज सादर करावा.

(४) दुस-या व चौथ्या सत्राच्या परीक्षा संपल्यानंतर तीन दिवसांच्या कालावधीत महाविद्यालयांच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी त्यांच्या शिफारशीसह संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिव कार्यालयाकडे वरील अर्ज सादर करावेत.

(५) सर्व शासकीय / अनुदानित / विना अनुदानित महाविद्यालयातील मागील दोन शैक्षणिक वर्षाचा शैक्षणिक वर्षनिहाय रिक्त जागांचा तपशील वरील विनंती अर्जासोबत संबंधित कृषी विद्यापीठाकडे सादर करावा. बदलीसाठीचे विनंती अर्ज नसल्यास फक्त रिक्त जागांचा तपशील कृषी विद्यापीठाकडे सादर करावा.

(६) प्राप्त विनंती अर्जांपैकी संबंधित विद्यापीठांतर्गत आंतरमहाविद्यालयीन बदली अर्जांची छाननी करून पंधरा दिवसांच्या कालावधीत अशा आंतरमहाविद्यालयीन बदली अर्जांबाबत विद्यापीठस्तरावर योग्य ते निर्णय घेऊन संबंधित विद्यापीठाच्या अधिष्ठाता (कृषी) यांच्या मान्यतेने निकाली काढावेत. तद्नंतर आंतरविद्यापीठीय विनंती अर्जांची छाननी करून विहित नमुन्यात गोषवारा आठ दिवसांच्या कालावधीत कुलसचिवांनी कृषी परिषदेकडे सादर करावा. (विहित नमुना सोबत 'परिशिष्ट ड' येथे दर्शविण्यात आला आहे.)

(७) चारही कृषी विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय / अनुदानित / विना अनुदानित महाविद्यालयातील मागील दोन शैक्षणिक वर्षाचा शैक्षणिक वर्षनिहाय रिक्त जागांचा तपशील वरील गोषवा-याबरोबरच कृषी परिषदेकडे सादर करावा.

(८) विद्यार्थी किंवा महाविद्यालयांकडून कृषी परिषदेकडे परस्पर पाठविण्यात आलेले विनंती अर्ज तसेच विद्यार्थ्यांकडून कृषी विद्यापीठांकडे परस्पर पाठविण्यात आलेले विनंती अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(९) चारही कृषी विद्यापीठांकडून बदलीविषयक अर्ज प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या कालावधीत कृषी परिषदेने चारही कृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांची बैठक आयोजित करून आंतरविद्यापीठीय बदल्यांसदर्भात योग्य ते निर्णय घेण्यात येतील. विद्यार्थी सध्या ज्या कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयामध्ये असेल त्या कृषी विद्यापीठाकडून अशा विद्यार्थ्याचे बदली आदेश सत्र नोंदणी दिनांकापूर्वी निर्गमित करण्यात येतील.

## परिशिष्ट 'क'

Name of the University.......................................................................................

(To be filled in original by the student and submit alongwith the attested true copies of his / her grade cards to the Associate Dean / Principal for onward submission to the Registrar of concerned Agricultural University.)

**PART- I (A)**

To,

The Registrar,

..................................................

..................................................

..................................................

| |
|---|
| **Photo** |

(Through: Associate Dean or Principal of the concerned college)

**Subject:-Interuniversity / Inter collegiate Academic Transfer of Undergraduate student.**

Respected Sir,

I, the undersigned hereby request for my academic transfer to the college as mentioned below in the ensuing term. It is therefore requested to forward this application along with your "No Objection Certificate" to the Registrar of Agricultural University for kind consideration.

| | | |
|---|---|---|
| (1) Name of student | : | ..........................................................................<br>(Surname) (First Name) (Father's / Husband's Name)<br>(Full name in Capital letters) |
| (2) Enrollment/Reg. No. | : | .......................................................................... |
| (3) Present College | : | ..........................................................................<br>.......................................................................... |
| (4) Degree Course | : | .......................................................................... |
| (5) Date of Admission | : | .......................................................................... |

| | | |
|---|---|---|
| (6) Academic year | : | ................................................................ |
| (7) Semester in which learning | : | ................................................................ |
| (8) Total credits passed up to date of application | : | ................................................................ |
| (9) Total Grade points and Cumulative Grade Point Average obtained (Attested copies of grade cards enclosed) | : | ................................................................ |
| (10) Name of the University where intends to be transferred | : | ................................................................<br>................................................................ |
| (11) Name of college(s) where intends to be transferred | : | ................................................................<br>................................................................ |
| (12) Genuine reason for academic transfer (In case of medical reason, the Certificate of District Civil Surgeon must be enclosed) | : | ................................................................<br>................................................................<br>................................................................ |
| (13) D.D. of Rs.500/- in favour of 'Comptroller, .......... *Name of the concerned University* .......' payable at concerned University headquarter is enclosed herewith. | : | D.D. No. : ................................................<br>Date : ................................................ |

Place : ________________

Date : ________________

**Signature of student**

**Signature** ____________________

**Name and Designation** ____________________

**of Counselor/Advisor** ____________________

## PART – I (B)

## NO OBJECTION CERTIFICATE OF PARENT

I have No Objection for effecting the transfer of my son/daughter from ______________________________ College to ______________________________ College.

Place : ______________

Date : ______________

**Signature and Name and Full Address of the Parent with contact numbers**

..............................................................................................................................

## पालकांचे ना हरकत प्रमाणपत्र

______________________________ या महाविद्यालयातून ______________________________ या महाविद्यालयात माझ्या पाल्याची बदली करण्यास माझी हरकत नाही.

स्थळ : ______________

दिनांक : ______________

**स्वाक्षरी, नाव आणि दूरध्वनी / मोबाईल क्रमांकासह पालकांचा पूर्ण पत्ता**

## PART – II

### NO OBJECTION CERTIFICATE

(To be issued by the Associate Dean / Principal of the College in which the student is on roll)

Certified that this College has 'No Objection', if Mr. / Miss ________ ____________ ____________ is transferred to the college as applied.

**Associate Dean / Principal**

**Seal** ........................................................

(Name of the concerned college)

**Place :** ______________

**Date :** ______________

................................................................................................................................

## PART-III

(Application of the student to the Registrar of the University to which he / she intends to be transferred.)

To,

The Registrar,

______________________________

______________________________

**Subject : Inter University / Inter Collegiate Academic Transfer.**

Respected Sir,

I, the undersigned student of ______________ semester of ________ ____________ degree programme of the __________________________ (Name of the College) of ____________________________________________ Krishi Vidyapeeth, ________________ request that due to the reason given below, I intend for transfer to any of the following colleges of your University in the ___________ semester of the academic year ________________. Kindly consider my application for transfer at the earliest.

(a) Reason for academic transfer : ______________________________

____________________________________________________

(b) Preference of college(s) to which transfer is desired.

i) ________________________________________________

ii) ________________________________________________

iii) ________________________________________________

Yours faithfully,

Place : ______________

Date : ______________ **Signature and Name of the Student**

## PART- IV

(For the use of the office of the Registrar of concerned University)

### No Objection Certificate

This is to certify that this University has 'No Objection', if Mr. / Miss ________________________________ Enrolment / Reg. No. ________, a student of ______semester of ____________________________ (Name of the degree course) of ________________________________________ (Name of the college) is academically transferred to any of the colleges of ________________ ________________ ___ (Name of the University) in the ________ semester of the academic year ________________ as applied by him/her.

Place : ____________

Date : ____________

**Registrar**
**(Signature & Seal)**

................................................................................................................................................

C/2

## परिशिष्ट 'ड'

| अ. क्र. | नोंदणी क्रमांक | विद्यार्थी / विद्यार्थीनीचे नाव | बदलीचे सत्र | पहिल्या / तिस-या सत्रा-पर्यंतचा गुणांक भार | पूर्वीच्या सत्रांमध्ये पूर्ण विषय उत्तीर्ण नसल्यास अनुत्तीर्ण विषयांची संख्या. | बदली पाहिजे असलेल्या महाविद्यालयाचे नाव / नावे (पसंतीक्रमाने) | बदलीचे कारण | महाविद्या-लयाचे ना हरकत प्रमाणपत्र आहे / नाही | विद्या-पीठाचे ना हरकत प्रमाणपत्र आहे / नाही | अभिप्राय. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

स्थळ : ___________

दिनांक : ___________

(स्वाक्षरी)
कुलसचिव
(स्वाक्षरी व मुद्रा)

(टिप- शासकीय / अनुदानित महाविद्यालयांतून शासकीय / अनुदानित महाविद्यालयांमध्ये बदलीसाठी विनंती अर्ज, शासकीय / अनुदानित महाविद्यालयांतून विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये बदलीसाठी विनंती अर्ज, विना अनुदानित महाविद्यालयांतून विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये बदलीसाठी विनंती अर्ज असे स्वतंत्र गोषवारे देण्यात यावेत.)